जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८३०** **दिनांक - २४/११/२०२३**

खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर

## नवनाथ ऊर्फ नब्या सुरेश लोधा (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक ३०/१०/२०२३ रोजी रात्री फिर्यादी हे त्यांचे राहते घरी झोपले असताना,त्यांचे घराच्या दरवाजा वाजवल्या मुळे फिर्यादी यांनी घराचा दरवाजा उघडला असता,दरवाज्या बाहेर उभा असलेल्या नवनाथ ऊर्फ नब्या याने फिर्यादीस तेरा भाई किधर हैं असे विचारून,उसको बुला असे म्हणल्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचा चुलत भाऊ अनिल यास बाहर कोई आपको बुला रहा हैं असे सांगितले.त्यावेळी फिर्यादी यांनी किचन मध्ये पाणी पिऊन दरवाज्याकडे पाहिले. त्यावेळी अनिल हा नवनाथ ऊर्फ नब्या याचेबरोबर बोलत असताना,त्याने अनिल यास काहीतरी विचारले असता,अनिल याने मान हालवुन नकार दिला. त्याच वेळी नवनाथ ऊर्फ नब्या याने बंदुक काढून,फिर्यादीचा चुलत भाऊ अनिल याच्या कपाळावर लावुन गोळी झाडून त्यास गंभीर जखमी करून त्यांचा खुन करून,फिर्यादीचे राहते इमारती बाहेर थांबलेल्या त्याच्या साथीदारांसह दुचाकीवर बसून घाई गडबडीने निघून गेला. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.३६९/२०२३,भा.द.वि.कलम ३०२,३४,आर्म ॲक्ट कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा सन १९५१ चे कलम ३७(१)१३५** प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१)नवनाथ ऊर्फ नब्या सुरेश लोधा वय ३७ वर्षे,रा.श्रीकृष्ण हाईटस ५१२,घोरपडे पेठ पुणे (टोळी प्रमुख) २)गणेश उल्हासराव शिंदे,वय ४१ वर्षे,रा.चव्हाणनगर,धनकवडी पुणे ३)रोहीत संपत कोमकर,वय ३३ वर्षे,रा.७१५ गुरूवार पेठ,पुणे ४)अमन दिपक परदेशी,वय २९ वर्षे,रा.४१,घोरपडे पेठ,पुणे (टोळी सदस्य) यांनी केला असुन सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली आहे.**

वरील नमुद आरोपी नवनाथ ऊर्फ नब्या सुरेश लोधा (टोळी प्रमुख) यांचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता, त्याने संघटीत गुन्हेगारी टोळी तयार करून,टोळीचे वर्चस्व व दहशत निर्माण करण्यासाठी व अवैद्य मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी जबरी चोरी किंवा दरोडा टाकणे धमकी देणे किंवा धाकदपटशा दाखवुन जबरदस्ती करून आपली बेकायदेशीर कृत्ये चालु ठेवुन,त्याने व त्याचे इतर साथीदारांनी खुनाचा प्रयत्न करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे, दुखापत करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे अशाप्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांचे गुन्हेगारी वर्तना मध्ये सुधारणा होत नसल्याचे दिसुन येत असुन,त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा-पुन्हा गुन्हे केले आहेत.

दाखल गुन्हयाचे तपासामध्ये आरोपींनी संघटीतरित्या सदर गुन्हा केल्याचे निदर्शनास आल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुनिल माने यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०१,पुणे शहर,श्री.संदीपसिंह गिल यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.३६९/२०२३,भा.द.वि.कलम ३०२, ३४,आर्म ॲक्ट कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा सन १९५१ चे कलम ३७(१) सह १३५ या गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे शहर,श्री.अशोक धुमाळ हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०१,पुणे,श्री.संदीपसिंह गिल, मा.सहा. पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे,श्री.अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल माने, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संपतराव राऊत, सहा.पोलीस निरीक्षक,राकेश जाधव, पोलीस उप-निरीक्षक,अतुल बनकर, पोलीस अंमलदार, महेश पवार, नितीन जाधव, स्वप्नील बांदल यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन, शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शना खाली मकोका अंतर्गत केलेली ही ८९ वी कारवाई आहे.**